पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११०01८
वैद्यकीय विभाग,(धन्वंतरी सेल)
क्रमांक:- वैद्य/१४अ/कावि/८०० /२०१८
दिनांक - ११/१२/२०१८

विषय :- धन्वंतरी स्वास्थ्य योजना २०१३
कर्मचारी माहिती सादर करणेबाबत ...

परिपत्रक

पिंपरी चिंचवड महानगरपालिका अस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी तसेच कुटुंब व्याख्येनुसार त्यांचेवर अवलंबुन असणारे कुटुंबीय तसेच सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी (पती/पत्नी) यांचे वैद्यकीय उपचाराकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमा मधील तरतुदी नुसार धन्वंतरी स्वास्थ्य योजना-२०१३ दिनांक १ सप्टेंबर २०१५ पासून कार्यान्वित करण्यात आली आहे.

धन्वंतरी स्वास्थ्य योजना सुरु करण्याचे अनषंगाने डिसेंबर २०१४ पासुन जुलै २०१६ पर्यंत अनेक परिपत्रके काढून कर्मचारी व त्यांचेवर अवलबून असणारे कुंटुबातील सदस्यांची माहिती संगणकीय प्रणालीमध्ये नोंदवून सदर फॉर्मची प्रिंट काढून आवश्यक कागदपत्रे जोडून वैद्यकीय विभागाकडे सादर करणेबाबत कळविले आहे. तथापि अद्यापही काही विभागांकडील सर्व कर्मचा-यांची माहिती प्राप्त झालेली नाही. प्रामुख्याने सर्व क्षेत्रिय कार्यालयांची ७० टक्के पर्यंतच माहिती प्राप्त झालेली आहे. त्यामुळे माहिती प्राप्त न झालेल्या कर्मचा-यांची वैद्यकीय उपचारासाठी मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत असून तक्रारी येत आहेत.

अपात्र कर्मचा-यांची माहिती पाठविणे बाबत वेळोवेळी कळविले होते. परंतु सदरची माहिती या कार्यालयाकडे अदयाप पर्यंत पाठविलेली नाही. त्यामुळे कर्मचा-यांचे वैदयकीय उपचाराची गैरसोय होत आहे. सदरची बाब अत्यंत गभीर स्वरूपाची असून ज्या कर्मचा-याचे फॉर्म अदयापर्यंत संगणकावर अपलोड झालेले नाहीत त्या संबधीत कर्मचा-यांची वैदयकीय गैरसोय झाल्यास शाखाप्रमुख जबाबदार राहतील यांची नोंद घ्यावी.

(डॉ. के. अनिल रॉय)
आरोग्य वैद्यकीय अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११०१८.

प्रति,
सर्व संबंधित शाखाप्रमुख
प्रत - १) मा. आयुक्त
२) प्रशासन विभाग